



॥श्री॥

# बृहदारण्यकोपनिषद

(चौथा अध्याय)

(मंत्र - ७४, ओव्या - ८०६)

## भूमिका

येथ देवरात जनक प्रश्नकर्ता । याज्ञवल्क्य ज्ञानदाता । आचार्य जैसा श्रेष्ठ वक्ता । भगवत् स्वरुप ॥७॥
ग्रंथी गूढ असे ज्ञान । स्पष्ट असे विवेचन । मुमूक्षूसी समाधान । अजीव असे ॥८॥
येथ सकल ब्रह्मज्ञान । लक्षण तैसेचि साधन । चार अवस्थादि निरुपण । परिपूर्ण ते ॥९॥

## निवेदन - काही ओव्या

अहो बृहदारण्याचा विस्तारु । दीर्घ प्रदीर्घ प्राकारु । मज ना इतुला धीरु । वर्णावयातें ॥१॥
तेथे निवडो पाहो जरी । ती जाण नोहे अंतरी । म्हणून जाणतयांचे तरी । मागे जाऊ ॥२॥
तयातें पुशिता पुशिता । अध्यायो धरिला चौथा । जेथ आत्मा निवडूनि तत्वतां । हाती दिला ॥३॥
बृहदारण्याचा विस्तार फारच प्रचंड असल्याने त्याचे वर्णन करण्याएवढा धीर माझ्यापाशी नाही ॥१॥ त्यात निवडावे म्हटले तर ती बुद्धीही नसल्याने जाणत्यांना विचारले ॥२॥ त्यांना विचारता विचारता ज्या अध्यायात आत्मतत्व चाळून चाळून जणू हातात दिले आहे त्या चौथ्या अध्यायाचे चिंतन करावयाचे ठरविले ॥३॥

## संबंध भाष्य - काही ओव्या

जनक जो कां भूपती । तया ज्ञानाही होती आर्ती । समाहित पावन मति । नम्रत्वेसी ॥७॥
स्थावरी जैसा हिमालय । ज्ञानियामाजी याज्ञवल्क्य । संवादी जयाचे वाक्य । वज्र जैसे ॥९॥
जनका आत्म्यालागी आर्ती । ती होये जेथे पुरती । एका याज्ञवल्क्य संगती । श्रीगुरुरूप ॥१२॥
तयाची बोध विधाने । माजी पृथ्व्यादि अष्ट स्थाने । अग्न्यादि लोकवर्णने । तेही अष्ट ॥१३॥
अष्ट देव अमृता जैसे । पुरुष शारीरिक तैसे । इया उपाधिपैली पैसे । आत्मरुप ॥१४॥
राजा जनक अंतर्मुख, मनाने पवित्र व नम्र असून त्याला ज्ञानप्राप्तीची सतत तळमळ असे ॥७॥ स्थावरामध्ये जसा हिमालय पर्वत श्रेष्ठ त्याप्रमाणे ज्ञानी जनांत याज्ञवल्क्य वरिष्ठ होता. वादविवादात त्याचे बोलणे वज्राप्रमाणे परिणामकारक असे. ॥९॥ जनकाला आत्मज्ञानाची जी तळमळ होती ती निवण्यासाठी श्रीगुरुस्वरूप याज्ञवल्क्याशिवाय अन्य कोणीही नव्हते.॥१२॥ त्या याज्ञवल्क्याने उपदेश करताना जे सांगितले त्यात अगोदर (मागील अध्यायात) पृथ्वी आदी करुन आठ

स्थाने, अग्नी आदीकरुन आठ लोकांचे वर्णन, ॥१३॥ अमृत वगैरे आठ देव, शरीरधारी पुरुष त्यांचे जे वर्णन आले आहे त्या सर्व उपाधींच्या पलीकडे आत्मा असतो. ॥१४॥

शान्तिपाठ

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः! शान्तिः !! शान्तिः !!!

उपनिषदातील काही मंत्र (काही मंत्र फार मोठे व संवादरुप असल्याने ते न देता त्यातील अर्थाचा गोषवारा दिला आहे) व विवरणात्मक ओव्या -
मंत्र क्र. २ मध्ये याज्ञवल्क्याने जनकाला कोणत्या आचार्यांनी काय सांगितले ते विचारले. त्या संवादातील काही ओव्या -
ऐसा आचार्य "जित्वा" नावे । "वाणी" तेचि ब्रह्म दावे । जे वाणीचिये अभावे । व्यर्थ सारे ॥३०॥
जयातें वाणी नोहे । तया ठायी काय राहे । इह ना परत्र पाहे । साफल्याचे ॥३१॥
म्हणून ब्रह्म तेचि वाणी । तियेचे राही उपासनी । तो देव राहे होऊनी । इहपरत्री ।।३२॥
तंव याज्ञवल्क्य म्हणितले । पादत्रयां का जाणिले । अहो एकचि पादा कथिले । जनकु म्हणे ॥३३॥
जे वाणीरुप ब्रह्म । तयाचे वाचा हेचि धाम । आणि आकाश जे परम । प्रतिष्ठा ते ॥३६॥
वाणी वाचाधामे वर्ते । ज्ञान तियेचेनि होते । जीवा जे जे कळते । ते तियेचेनी ॥३७॥
ती वाणी जेथुनी येई । असे तोवरी राही । अन्ती नियमे जाई । आकाशश्रयी ॥३९॥
अरे जनका नृपा प्राज्ञा । चतुर्थ पाद तो प्रज्ञा । जो परब्रह्मी अज्ञा । अभिन्न वाटे ॥४०॥
प्रज्ञा वाणीतें ज्ञान सांगे । कर्मी वाणीसवे रंगे । स्वये आत्माचिया योगे । ज्ञानी होई ॥४१॥
म्हणून प्रज्ञा जणू ब्रह्म । प्रतिबोधी ठेविले वर्म । जे केनोपनिषदी सुगम । दाविले असे ॥४२॥

असो ! जित्वा नावाचे आचार्य वाणी हेच ब्रह्म आहे असे म्हणाले. वाणी नसेल तर सर्वच व्यर्थ असते ॥३०॥ ज्याला वाणी नसते त्याला काय असते? ह्या व परलोकाची सफलता त्याच्या वाट्याला येत नाही. ॥३१॥ म्हणून वाणी हेच ब्रह्म असून तिची उपासना करणारा ह्या व परलोकी देवच होऊन राहतो. ॥३२॥ तेव्हा याज्ञवल्क्य म्हणाले, त्या वाणीरुप ब्रह्माचे उरलेले तीन पाद तुला सांगितले का? जनक म्हणाला - अहो, मला एकच पाद त्यांनी सांगितला. ॥३३॥ त्या वाणीरुप ब्रह्माचा वाचा हा आधार असून आकाश हा उगम आहे. ॥३६॥ वाणी जिभेच्या आधाराने असते. तिच्यामुळे ज्ञान होते. कारण जीवाला जे जे कळते ते तिच्याद्वाराच व्यक्त होते. ॥३७॥ ती वाणी ज्या आकाशाचा गुण आहे ते आकाश असेपर्यंत राहते व प्रलयकाळी आकाशाच्या आश्रयाला गेल्याशिवाय राहत नाही ॥३९॥ हे बुद्धिमान जनक राजा ! प्रज्ञा हा (त्या वाक् ब्रह्माचा) चौथा पाद असून तीच ब्रह्म आहे, असे अज्ञानी जनांना वाटते. ॥४०॥ बुद्धी वाणीवाटे प्रकट करते, कर्मे करत असता त्यात सहभागी होते परंतु तिला स्वतःला मात्र आत्म्याच्या ("चित्")मुळेच ज्ञान होत असते ॥४१॥ त्यामुळे प्रज्ञा हेच ब्रह्म आहे असे वाटते. "प्रतिबोध" शब्दाच्या आधाराने केनोपनिषदात जे वर्म चांगल्या रीतीने स्पष्ट केले आहे. ॥४२॥

दुसऱ्या ब्राह्मणातील पहिल्या मंत्रामध्ये आपल्या ज्ञानातील अपूर्णता कळल्यावर सम्राट जनक याज्ञवल्क्याला शिष्यभावाने शरण जातो. त्यावर ते त्याच्या साधनचतुष्टयसंपन्नतेचे कौतुक करतात व मुख्य प्रश्न विचारतात की ह्या देहातून निघताना तू कोठे जाशील? जनकाने याचे उत्तर त्याला माहित नसल्याचे सांगितल्यावर याज्ञवल्क्य या ब्राह्मणात ते

देतात -

तैसी उपासनेसी आर्ती । होआवयालागी पुरती । वेदीं उपासना रीती । व्यक्त ब्रह्माची ॥९३॥
वाणी, डोळे, कर्ण । तैसे मनरूप अन्तःकरण । तेचि व्यक्त ब्रह्म जाण । उपासनेसी ॥९४॥
ऐसी ज्ञानेसी उपासना । तुज आचार्य देती नाना । पुढती तव कल्याणा । तूचि आथी ॥९६॥
परी व्यक्तीं जे जे केले । ते अपराठायी राहिले । परब्रह्म पाहिजे जाणिले । होवोनि तेची ॥९७॥
जव अवस्था नाही ऐसी । तव अभयता कवणा कैसी । भेदु तव भया आपैसी । जागा असे ॥९८॥
तू तव देह टाकिता । इया उपासना करिता । तुज फळसमूह कोणता । लाभे सांगे ॥१०२॥

त्याप्रमाणे उपासनेची तळमळ पूर्ण होण्यासाठी वेदामध्ये व्यक्त ब्रह्माच्या उपासनेची रीत सांगितली आहे. ॥९३॥ उपासनेसाठी वाणी, डोळे, कान व अन्तःकरणचतुष्ट्य हेच व्यक्त ब्रह्म आहे असे जाणून घे. ॥९४॥ अशा रीतीने तुझ्या आचार्यांनी तुला ज्ञानासह उपासना सांगितल्या असून ह्यापुढे तुझे कल्याण तूच करून घ्यायचे आहे. ॥९६॥ परंतु व्यक्त ब्रह्माविषयीचे ज्ञान व उपासना अपर म्हणजे कनिष्ठाविषयीच होते. परब्रह्म तर ते होऊनच जाणावे लागते. ॥९७॥ असे होत नाही तोपर्यंत अभयपण कोणाला बरे प्राप्त होईल? व भेद आहे तोपर्यंत भयाला सहजच अवसर असतो. ॥९८॥ हा तुझा देह टाकल्यावर तुला कोणता फळांचा साठा मिळणार आहे ते मला सांग ॥

विश्व जो जागेपणी । तैजस स्वप्नाचे प्रांगणी । तोचि प्राज्ञ निद्रेचे घोरणी । सुषुप्तिरुप ॥१३३॥
जो प्राणु आपुले देही । तोचि दशदिशामाजी राही । प्राणाते प्राण तो पाही । तुरीय जो ॥१३७॥
मग श्वासुही होये मंद । तुरीयी होये धुंद । तिये पैली जो आनंद । तोचि होई ॥१३८॥
जो घडला आनंदाचा । आत्मा दावो न ये साचा । "नेति" शब्दे अभिभवाचा । वेदघोषु ॥१३९॥
जनकु अधिकारे अथिला । वरी याज्ञवल्क्ये बोधिला । तो ठायिची आनंद झाला । भयातीतु ॥१४१॥
याज्ञवल्क्य म्हणे जनका । सुख हिंदोळी घेई झोका । भय तरी कधी असे का । एकल्या एका ॥१४२॥
तंव जनकु म्हणे गुरुवरा । नेणता उपाधीचा पसारा । स्वये निर्भय असतां खरा । धरिले भलते ॥१४४॥
ते ज्ञान तुवा गा दिले । स्वरूप मज दाविले । जवळी ना काही उरले । दक्षिणेलागी ॥१४७॥
मी शरीरभावा सांडिले । माझे ना काहीं राहिले । देता-घेता तेही नुरले । अद्वय भावे ॥१४८॥
परी वेव्हाराचे भागी । उत्तीर्णतेलागी । हा देहचि चरणी त्यागी । वैभवेसी ॥१४९॥

जागृतावस्थेत ज्याला "विश्व" म्हणतात तोच स्वप्नात तैजस असून गाढ झोपेते तो "प्राज्ञ" असतो. ॥१३३॥ त्याच्या स्वतःच्या देहात जो प्राण असतो तोच दाही दिशांत भरुन राहतो. प्राणालाही प्राणरुप असलेला तूर्य तो अनुभवतो. ॥१३७॥ तेव्हा त्याचा श्वासही मंद होऊ लागून तो त्या अवस्थेत धुंद होतो व तिच्यापलिकडील आनंदरुपात लीन होऊन राहतो. ॥१३८॥ जनक स्वतः अधिकारसंपन्न असून शिवाय याज्ञवल्क्याने उपदेश दिल्याने तो तेथेच भयरहित होऊन अनंतरुप झाला. ॥१४१॥ याज्ञवल्क्य जनकाला म्हणाले, "आता तू सुखाच्या झोपाळ्यावर झोके घे. एकमेव अद्वितीयाला कधीतरी भीती असते का?" ॥१४२॥ तुला आता पुनर्जन्माचे भय नाही मग वृद्धत्व कसे असेल? त्यामुळे मरणही सहजच दूर गेले आहे.॥१४३॥ तेव्हा जनक म्हणाला, " हे गुरूदेवा, उपाधीचा प्रचंड पसारा न समजल्याने मी भयरहित असूनही भलत्याच कल्पनांना कवटाळून बसलो" ॥१४४॥ ते ज्ञान आपण मला दिले व स्वरुपदर्शन घडविले. आता दक्षिणा देण्यासाठी माझे असे माझ्याजवळ काहीच उरले नाही ॥१४७॥ "मी देह" अशी माझी समजूत गेली. माझे म्हणून काही राहिले नाही व अद्वैतावर आरूढ झाल्याने देणारा व घेणाराही उरला नाही" ॥१४८॥ परंतु व्यावहारिक सत्तेत उतराई व्हावे म्हणून हा देह राज्यवैभवासह आपल्या चरणी अर्पण करीत आहे. ॥१४९॥

तिसऱ्या ब्राह्मणात जनकाचा प्रश्न आहे की देहातील हा पुरुष कोणाच्या सत्तेवर - कोणाच्या प्रकाशात व्यवहार करतो त्या संवादाचा काही भाग –

पुसे याज्ञवल्क्य गुरुवरा । जो जीवो वसे तनुपुरा । कवण ज्योतीचेनि वेव्हारा । समर्थु आथी ॥३-१५५॥
जयातें देही म्हणिपती । जीव ऐसी असे ख्याती । तया जागृती कोणती ज्योती । वेव्हारातें ॥३-१५६॥
याज्ञवल्क्य म्हणे विदेहा । आदित्य ज्योतीचेनि हा । दिनक्रमाचे प्रवाहा । सामोरा जाई ॥३-१५७॥
आदित्य जै कां मावळे । चंद्र चंद्रिकेचेनि बळे । बैसे, विहरे, खेळे । फिरे मागे ॥३-१५९॥
ना दिसती जेव्हा दोन्ही । आधारा असे अग्नी । पलिता विजेरी नयनी । उजेडु कसे ॥३-१६०॥
आणि विजेरी ना सांपडे । काही न कळे कोठे दडे । तेथ वाणीचेनि उजाडे वेव्हारालागी ॥३-१६१॥
परी इया चारी ज्योती । सुषुप्ती स्वप्नीं मावळती । तै जीव कोणते रीतीं । वेव्हारी राही ॥३-१६५॥
सूर्यातें आत्म्याचा उजेडु । डोळ्यातें बघावया पाडू । मनातें जाणावया चाडू । आत्म्याचेनि ॥३-१७३॥
ऐसेनि जागृतीचे वेळे । डोळां सूर्यादि ज्योति कळे । परी स्वप्नसुषुप्ती मेळे । ना दिसे ती ॥३-१७५॥
तरी ती ज्योती आहे । जनका तू पुरती पाहे । ती "आत्मा" नामे राहे । व्यापोनि काया ॥३-१७६॥
जनकाने श्रीगुरु याज्ञवल्क्यांना विचारले - देहनगरीमध्ये जो जीव राहतो तो कोणत्या प्रकाशाच्या साह्याने व्यवहार करतो? ॥१५५॥ ज्याला देही असे म्हणतात व ज्याला जीव असेही नाव आहे त्याला जागेपणी व्यवहारामध्ये कोणता प्रकाश असतो?॥१५६॥ याज्ञ. - हे विदेहा! सूर्यप्रकाशात तो दिवसभराचे व्यवहार पार पाडतो. ॥१५७॥ जेव्हा सूर्य मावळतो, तेव्हा चंद्रप्रकाशात बसतो, सैर करतो, खेळतो व परत फिरतो. ॥१५९॥ जेव्हा सूर्य व चंद्र हे दोन्ही नसतात तेव्हा अग्नीच्या प्रकाशात काम करतो. मशाल व विजेरी यांच्या सहाय्याने डोळे पाहू शकतात. ॥१६०॥ परंतु विजेरी जेव्हा हाताला लागत नाही व आगपेटीही कोठे सापडत नाही तेव्हा शब्दांच्या आधारावर कार्य होते. ॥१६१॥ परंतु ह्या चारी ज्योती जेव्हा स्वप्नात किंवा झोपेत असत नाहीत तेव्हा जीवाचे (स्वप्नादी) व्यवहार कसे होतात?॥१६५॥ सूर्यालाही आत्मप्रकाशामुळेच सूर्यत्व आले असून डोळ्यांना त्यामुळेच पाहता येते. मन जाणू शकते तेही आत्म्यामुळेच ॥१७३॥ अशा प्रकारे जागेपणी सूर्यासारख्या ज्योती डोळ्यासारख्या अवयवाने कळतात, परंतु स्वप्न व सुषुप्तीमधील ज्योती इंद्रियांना कळण्यासारखी नसते.॥१७५॥ पण ती ज्योती आहे व असते हे नक्की! जनका तू ती व्यवस्थित जाणून घे. सर्व शरीर व्यापून राहणाऱ्या त्या ज्योतीला आत्मा असे म्हणतात. ॥१७६॥

कतम आत्मेऽति योऽयं विज्ञानमयः प्राणेषु हृद्यन्तर्ज्योतिः पुरुषः स समानः सन्नुभौ लोकावनुसञ्चरति श्यायतीव लेलायतीव स हि स्वप्नो भूत्वेमं लोकमतिक्रामति मृत्योरुपाणि ॥३-७॥
ध्यानी सूक्ष्मत्वाची सीमा । बुद्धीचा लागे गरिमा । जी स्वयेचि असे संभ्रमा- । माजी रुतली ॥१९६॥
तैसी बुद्धी जी का मानवी । ती भलते भलते ठरवी । आणि तियेचिते प्रभावी । आत्मा झालो. ॥१९८॥
याज्ञवल्क्या पुसे जनकु । मज आत्मा दावा एकु । जेथ वेव्हार होती अनेकु । जीवनामाजी ॥१९९॥
हे जनक मुमूक्षू नृपते । हेचि आत्मस्वरुप ते । जे बुद्धिद्वारा प्रगटते । विज्ञानरुपे ॥२०४॥
का अंधारी ठेविला दिवा । ज्योतिचा दिसे तेवा । परी तैलाचा दडे ठेवा । वातीखाली ॥२०५॥
तैसे बुद्धीचे जे जाणणे । ते जाणणे होय जेणे । तो आत्माचि परी नेणे । अज्ञानी जो ॥२१०॥
आणि बुद्धीचिये ठायी । आत्माचि व्यापुनी राही । तोचि पाहे, ऐके पाही । अन्तरामा ॥२१२॥
वसे हृदयामाजी आत्मा । ते हृत् कमळाचे धामा । जे बुद्धीचिये आश्रमा । आधारू असे ॥२२३॥

आणि बुद्धीमाजी भरोनी । आत्मा राहे लपोनी । जागृति, स्वप्नी, शयनी । विचरे जणू ॥२२४॥
आत्मा ज्ञानाचा असे झाला । म्हणून प्रकाश म्हणो आला । जेथ प्रकाश तेथ ज्योतीला । गाभा असे ॥२२६॥
जे नित्य अनित्यामाजी । ते चेतन अचेतनामाजी । जे प्रकाशे स्वयंतेजी । जगत् भासे ॥२३६॥
ऐसे आत्म्याचेनि जरी । जीव जगे वेव्हारी । तो कळो ना येई तरी । जागृतीमाजी ॥२४८॥
म्हणून स्वप्नाधारे । सुषुप्तीचे विचारे । आता पुढती विचरे । निरूपण ॥२४९॥
जो जागृती जगता उजळे । तयेचि स्वप्नीचे डोहाळे । तोचि सुषुप्ती सुखे लोळे । बुद्धीसवे ॥२७५॥
ऐसेनि हे जनकराज्ञा । आत्मया प्रकाशे प्रज्ञा । जियेचेनि जीवनयज्ञा । भारा दिसे ॥२९९॥
आत्मा एकला असे शुद्ध । कूटस्थ असे नित्यसिद्ध । स्वयंज्योति नित्यबुद्ध । अवस्थेवीण ॥३००॥
ध्यानामध्ये सूक्ष्मचिंतनाची परिसीमा गाठताना अति तरल बुद्धीची आवश्यकता असते. आणि ती तर स्वतःच संभ्रमित असते. ॥१९६॥ त्याप्रमाणे माणसाची बुद्धी भलभलते निश्चय करून बसते व त्यामुळेच आत्मस्वरूप झाकल्यासारखे होते. ॥१९८॥ याज्ञवल्क्याला जनक म्हणाला, जीवनात सर्व व्यवहार ज्याच्या सत्तेवर होतात त्या एक आत्म्याचे स्वरूप मला समजावून सांगा ॥१९९॥ हे राजा जनका ! बुद्धीच्या माध्यमातून विज्ञानरुपाने जे प्रगट होते तेच आत्म्याचे स्वरूप आहे असे जाण ॥२०४॥ अंधारात जर दिवा ठेवला असेल तर ज्योत तेवताना दिसते. पण तेलाचा साठा मात्र वातीच्या दुसऱ्या टोकाजवळ लपलेला असतो. ॥२०५॥ त्याचप्रमाणे बुद्धी जे जे जाणते ते जाणणे आत्म्यामुळेच होते. पण अज्ञानामुळे ते लक्षात येत नाही. ॥२१०॥ अंतःकरणात आत्मा पूर्ण व्यापून राहून तोच अंतरात्मा पाहतो व ऐकतो. ॥२१२॥ हृदयात आत्मा राहतो असे म्हणतात ते त्याचे बुद्धीत पडलेल्या प्रतिबिंबाच्या दृष्टीने असते. बुद्धीला हृदयरूप कमळाचे घर आश्रयासाठी लागते. ॥२२३॥ त्या बुद्धीत आत्मा गुप्तरूपाने व्यापून राहतो व जणू जागृती, स्वप्न व झोप ह्या तीन अवस्थांमध्ये फिरत राहतो. ॥२२४॥ आत्मा ज्ञानरूप आहे. म्हणूनच त्याला प्रकाश असे म्हणतात. जेथे प्रकाश असतो तेथे ज्योत असावीच लागते ॥२२६॥ जे अनित्यामध्ये नित्यत्वाने असते, अचेतनात चेतनरूपाने राहते असे स्वयंप्रकाश ब्रह्म असल्यानेच जगताचा हा आभास होत राहतो. ॥२३६॥ अशा कारणाने जागृतावस्थेत जीवाचे सर्व व्यवहार आत्मसत्तेवर होत असले तरी ते कळून येत नाही. ॥२४८॥ म्हणून आता ह्यापुढे स्वप्न व गाढ झोपेच्या विचाराच्या आधाराने स्पष्टीकरण होईल. ॥२४९॥ जो जागृतीमध्ये जग दाखवतो, स्वप्नात अनेक विचित्र प्रकार दाखवतो तो आत्माच बुद्धीमध्ये भरून झोपेत देहाला निश्चेष्ट पाडतो. ॥२७५॥ अशा रीतीने हे जनका! आत्म्याने बुद्धी प्रकाशित होते व तिच्यामुळेच हे सर्व जीवन चालू राहते. ॥२९९॥ आत्मा तर एकमेव, उपाधीरहित, साक्षी व नित्यरूप असून अवस्थारहित असा तो स्वयंज्योती व ज्ञानस्वरूप असतो. ॥३००॥

तिसऱ्या ब्राह्मणात यापुढे जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थांचे विस्तृत वर्णन केले आहे. तसेच तैत्तिरीयात सांगितलेली आनंदमीमांसाही याच ब्राह्मणात आहेत. शेवटी व तसेच चवथ्या ब्राह्मणात जीवाची गती, मुक्तीसाठी साधन, मुक्ती, जीवन्मुक्तीनंतरचे जीवन व विदेहमुक्ती यांचे वर्णन आहे.

पाचव्या ब्राह्मणात याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद आहे. याज्ञवल्क्य ऋषींना दोन भार्या होत्या. कात्यायनी संसारात रमणारी होती. मैत्रेयी श्रेयाची आवड असणारी होती. याज्ञवल्क्य संन्यास घेण्याच्या विचाराने संपत्तीची वाटणी करू लागले. त्यावर मैत्रेयीने त्यांना विचारले - मैत्रेयी सवेचि पुसे । धनसंपदेचे भरवसे । अमरत्व माते असे । किंवा नसे ॥७६७॥ त्यावर याज्ञवल्क्यांनी सांगितले की - सुखदुःखाचे जीवनी । वैभव जरी भरभरूनी । तरी अमरत्व तेथ कैसेनि । कवणा येई ॥७६९॥

सा होवाच मैत्रेयी येनाहं नामृता स्यां किमहं तेन कुर्या यदेव भगवान् वेद तदेव मे ब्रूहीति ॥४॥
मग मैत्रेयी म्हणे देवा । मज प्रपंच कासया हवा । अमरत्व मिळे ती दावा । वाट माते ॥७७१॥
तेव्हा मैत्रेयी त्यांना म्हणाली, मला या प्रपंचाचा उपयोगच काय? ज्याने अमृतत्व मिळेल असे साधन मला सांगा ॥७७१॥
स होवाच न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति। न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवत्यात्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति । --- न वा अरे वित्तस्य कामाय वित्तं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति । --- न वा अरे सर्वस्य कामाय सर्वं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति । आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो निदिध्यासितव्यो मैत्रेय्यात्मनि खल्वरे दृष्टे श्रुते मते विज्ञात इदँसर्वं विदितम् ॥६॥
पत्नी पुत्र तैसा पती । परस्परांअ प्रियत्वे रहाती । ते आपुलेनि असे प्रीती । निश्चये करोनी ॥७७४॥
जै पन्ती पंचत्वा जाई । दुजी सवेचि आणी घाई । पुत्रा ताणूनिया देई । आज्ञाभंजका ॥७७५॥
नाना पशु आणि धना । सांभाळी आपुले भुवना । जंव आपुले प्राणी बेतेना । तंवचि राखे ॥७७६॥
ऐसेनि जगत् गे सारे । मह प्रिय वाटे खरे । ते माझिया स्वार्था भरे । आन नोहे ॥७७७॥
म्हणून आत्मा एक ऐकावा । तोचि एक पहावा । आत्माचि हृदयी धरावा । अखंडपणी ॥७७८॥
मग आत्माचि आत्मा दिसे । आन काही न भासे । जे आत्मया भिन्न भरवसे । काही नाही ॥७७९॥
पत्नी, मुलगा व नवरा एकमेकांना प्रिय असतात ते स्वतःच्या सुखासाठी असतात हे नक्की समजून असावे. ॥७७४॥ जेव्हा पत्नी मरण पावते तेव्हा पती पाठोपाठ दुसरा विवाह करतो व आज्ञा न पाळणाऱ्या मुलाला घरातून हाकलून देतो. ॥७७५॥ गाई म्हशी व संपत्ती आपल्या घरात सांभाळतो हे खरे, पण स्वतःच्या प्राणावर संकट आले असता त्यांचा प्रसंगी त्यागही करण्यास मागेपुढे पाहत नाही. ॥७७६॥ म्हणून (जगाच्या अनुसंधानात न राहता) एका आत्म्याचेच श्रवण करावे, त्याचेच दर्शन घ्यावे व तोच हृदयामध्ये ध्यानरूपाने सांभाळावा. ॥७७७॥ मग सर्वत्र आत्माच भरलेला दिसतो व बाकी सर्व भास मावळून जातात कारण आत्म्याहून वेगळे कोठेही काहीही नाही. ॥७७९॥
ब्रह्म व्यापक एकटे । वर्णिता होई थिटे । परी ना सांगता न भेटे । कवणेयाही ॥७८६॥
म्हणून मांडिले पसारे । श्रुति तयांसी आवरे । आवरतां दावी खरे । ब्रह्मरूप ॥७८७॥

***